जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २३७ दिनांक :- ३१/०८/२०२१

# वेश्या व्यवसायावर कारवाई करुन वेश्यादलालास अटक करुन ०१ अल्पवयीन व ०१ पिडीत मुलीची सुटका -अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस. एस. पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, वेश्यादलाल नामे आकाश हा पुरुष गिऱ्हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात अल्पवयीन मुली पुरवितो, अशी माहिती मिळाल्याने वपोनि. पाटील यांनी वरिष्ठांचे परवानगीने बोगस गि-हाईक व पंचांना पाठवून मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळुन दि.२८/८/२०२१ रोजी १४.४० वा. पय्याडे हॉटेलच्या बाजुस नयानगर कडे जाणा-या रोडवर, मिरारोड पूर्व येथे छापा टाकला असता वेशादलाल आकाश जोगेंद्र गौंड वय २८ वर्ष रा. १२९ म्हाडा बिल्डीग, पिनाकोला बिल्डीगचे समोर, १५ नंबर बस स्टॉप, बेव्हर्लीपार्क, मिरारोड पूर्व मुळगाव- डुबरीया, पोस्ट खजनी, थाना- हरपूर, जिल्हा गोरखपूर राज्य उत्तरप्रदेश हा वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईकाकडुन पैसे स्विकारुन मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने त्याला वेश्यागमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन व ०१ प्रौढ मुलीची सुटका केली. सदर बाबत वेश्यादलाल आकाश जोगेंद्र गौंड वय २८ वर्ष याचेविरुद्ध नयानगर पोलीस ठाणे येथे पोहवा/२२६९ उमेश पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि क्र.४८१/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७०, सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी आकाश जोगेंद्र गौंड वय २८ वर्ष हा अभिलेखावरील गुन्हेगार असून त्याचे विरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.०४/२०१४ भादविसं.क. ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५,७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, सपोनि. तेजश्री शिंदे (भरोसा सेल), पोहवा/२२६९ उमेश पाटील, पोहवा.२२९८ निलंगे, मपोना./१७८९ यम्बर, मपोना.२८४५ कमल चव्हाण, पो.शि./३६६० केशव शिंदे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर (प.) यांनी केली आहे.

------ooooo-----